औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मंगळवार दि.८.९.९२ रोजी झालेल्या ७५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१] श्री. ईश्वरराव भोसीकर — सभापती औरंगाबाद मंडळ

२] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरू चारठाणकर. — सदस्य/औरंगाबाद मंडळ.

३] श्री. राजभोज
कार्यकारी अभियंता, मनपा, औरंगाबाद
आयुक्त म.न.पा. औरंगाबाद याचे — सदस्य प्रतिनिधी.

श्री. ज. वी. शहा उप सभापती/मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ हे रजेवर असल्यामुळे मंडळाच्या सभेस हजर राहू शकले नाही. तसेच उपसंचालक नगररचना औरंगाबाद विभाग हे बैठकीस अनुपस्थीत होते.

विषय क्र.१: दिनांक २९.७.९२ रोजी झालेल्या ७४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.४५८

दिनांक २९.७.९२ रोजी झालेल्या ७४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने सदरच्या कार्यवृत्तांस मान्यता दिली.

विषय क्र.२: मुंबई व्यतिरिक्त इतर ठिकाणी बांधण्यात येणा-या गाळ्यांची तात्पुरती किंमत ठरविण्या-बाबत.

ठराव क्र.४५९

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते असे ठरले कि, लाभार्थींची आर्थिक कुवत व बाजार भाव लक्षात घेता मध्यम व उच्च उत्पन्न गटातील गाळ्याचे वितरण भाडेखरेदी तत्वावरच करणे तसेच नफ्याचे प्रमाण खालील प्रमाणे घेणे योग्य होईल.

| अ.क्र. | गाळ्याचे बांधकाम क्षेत्र | नफ्याचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | २५ चौ.मी. पर्यन्त | 0% |
| २. | २५ चौ.मी. च्या वर ते ४० चौ.मी. पर्यंत. | ५% नफा अथवा बाजारभावाच्या मर्यादीत. |
| ३. | ४० चौ.मी. च्यावर ते ६० चौ.मी. पर्यंत. | १० % नफा अथवा बाजारभावा-च्या मर्यादित. |
| ४. | ६० चौ.मी. च्या वर. | १५% नफा अथवा बाजारभावाच्या मर्यादित. |

याप्रमाणे नफ्याचे प्रमाण आकारण्यास प्राधिकरणाकडून मंजूरी मिळण्यास्तव प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यासाठी मंडळाने मंजूरी दिली व प्राधिकरणाची मंजूरी गृहीत धरून योजनेचे बांधकाम करण्याची प्रक्रिया सुरु करावी असे ठरले.

विषय क्र.३: मंडळाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थानाचे वाटप करणेबाबत.

" सदरचा विषय कांही अपरिहार्य कारणामुळे रद्द करण्यांत आला आहे."

विषय क्र.४: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद अंतर्गत विविधविडी कामगार योजना.

या विषयावर चर्चा करतांना मा.सभापती श्री.भोसीकर यांनी अशी विचारणा केली की, विडी कामगार हे अनुदानास अपात्र कसे ठरतात? यावर कार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की, केंद्र शासनांकडून ज्या विडी कामगाराचे उत्पन्न रु.७००/- पर्यंत आहे अशा विडी कामगारास घरासाठी रु.५०००/- हे अनुदान मिळते. परंतु ज्या विडी कामगाराचे उत्पन्न रु.७००/- पेक्षा जास्त आहे. तो अनुदानासाठी अपात्र ठरतो पण मंडळाचे घर मिळण्यास पात्र ठरतो. अशा विडी कामगारास गाळा ताब्यात घेतांना अनुदानाची न मिळणारी रक्कम व त्यास भरावी लागणारी रक्कम अशी एकत्र भरावी लागणार आहे. यावर मा. सभापतींनी सांगितले की, सदर विडी कामगार इतकी रक्कम भरु शकणार नाही व अशी विचारणा केली की, अल्प उत्पन्न गटातील गाळ्यासाठी लाभधारकांकडून किती रक्कम गाळा ताब्यात घेण्यापुर्वी घेण्यात येते. यावर असे सांगण्यांत आले की, अंदाजे १५% रक्कम लाभधारकांकडून घेण्यांत येते.

यावर सभापतींनी सांगितले की, ज्याप्रमाणे अल्प उत्पन्न गटातील लाभार्थींकडून गाळा ताब्यात घेण्यापुर्वी रक्कम घेतो त्याप्रमाणे विडी कागारांकडून घेण्यांत यावी.

यावर कार्यकारी अभियंता श्री.देशपांडे यांनी असे सांगितले की, हडकोने अनुदान वगळूनच कर्ज मंजूर केलेले आहे. त्यामुळे विडी कामगारांकडूनच ती रक्कम घ्यावी लागेल.

यावर सभापतींनी असे सांगितले की, अनुदानास अपात्र असलेल्या विडी कामगारांना पैसे भरण्यासाठी सवलत द्यावी व गाळ्याचे वाटप करावे म्हणजे गाळ्याचे नुकसान होणार नाही.

ठराव क्र.४६०

या विषयावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, जे अर्जदार अनुदानास अपात्र आहेत त्यांना सुरुवातीस भरावयाच्या रक्कमे व्यतिरिक्त रु.५०००/- पे रु.१०००/- चा हप्ता दर वर्षाला भरण्याची सवलत द्यावी व रु.१०००/- चा हप्ता दर वर्षाला घेऊन त्यांना घरकुल देण्यांत यावे. व पुढील हप्ते भरण्याकरिता सदरिल लाभार्थींकडून तसे हमीपत्र घेण्यात यावे.

विषय क्र.५: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे जुलै/ऑगस्ट ९२ मध्ये वाटप करण्यात आलेल्या व शिल्लक गाळ्यांचा तपशिल.

ठराव क्र.४६१

या विषयावर चर्चा होऊन मंडळाच्या सदस्यांनी वाटप केलेल्या/शिल्लक असलेल्या गाळ्यांची नोंद घेतली. सदर गाळे वाटपासाठी त्वरित प्रयत्न करण्यात यावे असेही ठरले.

विषय क्र.६: मा.सभापतीच या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय

[१] मौ.कौठा जि.नांदेड येथील जमिनीवरिल योजनेबाबत.

मा.सभापतींनी पटलावरिल विषय संपल्यानंतर मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या ठिकठिकाणच्या नविन गृहनिर्माण योजनेसंबंधी/तथा ताब्यात येणाऱ्या जमिनी संबंधीच्या प्रगतीबाबत आढावा घेतला.

मौ.कौठा जि.नांदेड येथील शासकीय जमिन गट नं.८० मधील मंडळास प्राप्त झालेल्या जमिनीवर रस्त्यालगत गृहनिर्माण योजना राबविण्याच्या दृष्टीने सुचना दिल्यात.

ठराव क्र.४६२

चर्चेअंती असे ठरले की, मौ.कौठा जि.नांदेड येथील गट नं.८० मधील प्राप्त झालेल्या शासकीय जमिनीवर रस्त्यालगत गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्रयत्न करावे.

मा.सभापतींच्या परवानगीने सभा संपली.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या शुक्रवार दिनांक ९.१०.१९९२ रोजी होणाऱ्या ७६ व्या सभेपुढील विषय

---

विषय क्र. 2:
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे xxxxxसप्टेंबर १९९२, मध्ये वाटप करण्यांत आलेल्या व शिल्लक असलेल्या गाळ्यांचा तपशिल.

---

बाब टिप्पणी

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे विविध ठिकाणी बांधुन वाटपासाठी तयार असलेल्या गाळे वाटपाचा योजना निहाय तपशिल मंडळाच्या अवलोकनार्थ पटलावर ठेवण्यांत आलेला आहे.

अहवालावरुन असे लक्षात येईल की, एकतर अर्जदारांचा प्रतिसाद कमी असल्यामुळे किंवा अर्जदाराने कागदपत्राची पुर्तता न केल्यामुळे किंवा रकमेचा भरणा न केल्यामुळे वाटप प्रक्रियेत विलंब लागत आहे.

करिता बाब टिप्पणी मंडळाच्या माहितीस्तव सादर.

....

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या शुक्रवार दिनांक ९.१०.९२ रोजी होणाऱ्या ७६ व्या सभेपुढील विषय.

---

विषय क्र. ३

---

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्या वेळेस येणारे विषय.

---